सोलापूर : सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या लोगोचे अनावरण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख, आ. विजय देशमुख अन्य मान्यवर.

विजयकुमार मालकांच्या व्यासपीठावर बापूंचा रंगला कौतुक सोहळा; मुख्यमंत्र्यांकडून प्रशंसा; जिल्हा पर्यटन महोत्सव लोगोचे अनावरण

५ पी ब्रँडिंगद्वारे होणार सोलापूर पर्यटनाचा जागतिक प्रवास

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. याच्या लागोचे अनावरण सोलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख आदी उपस्थित होते.

या महोत्सवाचे उद्दिष्ट सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाचा सर्वांगीण विकास करणे आहे. या माध्यमातून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, निसर्ग व ग्रामीण पर्यटनाचा प्रचार होणार आहे. या महोत्सवाची संकल्पना ५ पी मार्केटिंग ब्रँडिंग या तत्वावर आधारित आहे. पहिले पी म्हणजे प्लेसेस - जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक व ग्रामीण पर्यटन स्थळे. दुसरे पी म्हणजे पर्सनॅलिटीज - सोलापुरातील कलाकार, संशोधक, आधुनिक शेतकरी, उद्योजक. तिसरे पी म्हणजे प्रॉडक्ट्स - स्थानिक खाद्यसंस्कृती, कृषी उत्पादन व औद्योगिक निर्मिती. चौथे पी म्हणजे प्लेसमेंट - तरुणांसाठी जास्तीत जास्त रोजगार निर्मिती. पाचवे पी म्हणजे पॉल्युशन फ्री एन्व्हायर्नमेंट - वृक्षलागवड व पर्यावरण संवर्धन.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस सोमवारी सोलापूर शहराच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांच्या हस्ते सोलापूर पर्यटन महोत्सवाच्या लागोचे अनावरण करण्यात आले.

सोलापूरच्या पर्यटनाचा ब्रँड देशभरात उंचावणार

या पर्यटन महोत्सवामुळे सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन क्षमतेला नवे व्यासपीठ मिळणार आहे. यातून ग्रामीण व शहरी भागातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पर्यटनाविषयी जागरूकता निर्माण होईल. जिल्ह्यातील नागरिकांना पर्यटन क्षेत्राशी जोडले जाण्याची संधी उपलब्ध होईल. स्थानिक उद्योग व बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळेल. जिल्ह्यात रोजगार निर्मितीला गती मिळेल, या महोत्सवामुळे सोलापूर पर्यटनाचा ब्रँड राज्यभरात आणि देशभरात उंचावणार आहे, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

देवाभाऊ म्हणाले, 'मालक तुमच्यावरचं अन् सोलापूरवरचं माझं प्रेम कायमच!'

आमदार देशमुखांचा 'प्रेमळ' आक्षेप; फडणवीसांच्या निर्वाळ्याची रंगली चर्चा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या पुढाकाराने साकारलेल्या सोलापूरनजिक दहिटणेच्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या लोकार्पणासाठी देशमुखांच्या आग्रहाला मान देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे रविवार (ता.१७) आले होते. यावेळी आमदार देशमुख यांनी भावनिक होत आपल्यावरील प्रेम कमी झाल्याचा 'प्रेमळ' आक्षेप लावला. त्याला अत्यंत हजरजबाबीपणातून फडणवीसांनी उत्तर दिलं...'मालक तुमच्यावरचं माझं प्रेम..!' फडणवीसांनी केलेल्या या विधानाची चर्चा आमदार विजयकुमार देशमुख समर्थकांसह सोलापूर शहर-जिल्हा भाजपात रंगली आहे.

त्याचं असं झालं की, विजयमालक (आमदार विजयकुमार देशमुख) म्हणाले, 'मुख्यमंत्र्यांचं सोलापूरवरचं प्रेम कमी झालं आहे काय?' त्यावर फडणवीस म्हणाले की, 'मालक तुम्ही लोक असताना माझं सोलापूरवरचं प्रेम कसं कमी होईल. तुमच्यावर प्रेम आहे, त्यामुळे सोलापूरवर माझं प्रेम कायम राहणार आहे. मी अडीच वर्षे उपमुख्यमंत्री होतो, तरी सोलापूरचा ट्रॅक सोडला नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मी अडीच वर्षे उपमुख्यमंत्री होतो, त्या वेळीही मी सोलापूरचा ट्रॅक सुटू दिला नव्हता. सोलापूरची पाणी योजना पूर्णपणे अडचणीत होती. त्या अडचणी दूर करून त्याचे नव्याने ट्रेंडर काढून त्याचे कॉन्ट्रक्ट केले होते. त्यावेळी माझ्याकडे अर्थखाते होते, त्यामुळे पैसेही उपलब्ध करून दिले होते. हे सर्व सोपस्कर पूर्ण करून आपण सोलापूरच्या समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण केले आहे.

सोलापूरकर लय हुशार...

सोलापूरसाठी आपण आता बंद पाईपद्वारे पाणी आणत आहोत. डब्ल्यूटीपीचे कामही आपण करणार आहोत. हे सगळं केल्यानंतर सोलापूरकर फार हुशार आहेत. त्यांना माहिती आहे की, एकदम सगळं मागितलं, तर देणार नाहीत, त्यामुळे जसं साडेआठशे कोटी रुपयांचे बंदिस्त जलवाहिनीचे काम झाले, असे फडणवीस यांनी नमूद केले.

सोलापूरच्या साडेआठशे कोटींच्या योजनेला मंजुरी दिली...

बंदिस्त जलवाहिनीचे काम झाल्यानंतर हे आमदार आणि पालकमंत्री माझ्याकडे आले आणि म्हणाले, आमचे पाईपलाईनचे काम झाले आहे. पण आमची पाणी वितरणाची व्यवस्था जुनी आहे. सोलापूरला रोज पाणी द्यायचे असेल तर आम्हाला नवीन वितरण व्यवस्था टाकावी लागेल. अतिरिक्त टाक्या बांधाव्या लागतील, अतिरिक्त पाईपलाईन टाकावी लागेल. मी म्हटलं करा. मला वाटलं दोनशे-तीनशे कोटींची योजना असेल. माझ्याकडे हे लोक साडेआठशे कोटींची योजना घेऊन आले. पण काळजी करू नका, त्याही योजनेला आपण मान्यता दिली आहे. सोलापूर शहरातील पाणी वितरणाची सुमारे साडेआठशे कोटी रुपयांची योजना करून सोलापूरसारख्या प्रमुख शहरात हे दक्षिणेतील अत्यंत महत्वाची महापालिका आहे. त्यामुळे सोलापूर महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रत्येक घरी रोज पाण्याचं पाणी गेलंच पाहिजे. असा आपला आग्रह आहे. त्यादृष्टीने आपण शहरातील पाणी वितरण योजनेलाही मान्यता देत आहोत, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

चांगला समाज घडवण्यासाठी चांगले विचार जोपासावेत : औसेकर महाराज

✔ सोलापूर/प्रतिनिधी

शिवदारे प्रतिष्ठानच्या जीवनगौरव पुरस्काराचे वितरण

सोलापूर : शिवदारे प्रतिष्ठानच्या जीवनगौरव पुरस्काराच्या वितरणप्रसंगी गहिनीनाथ महाराज औसेकर, राजशेखर शिवदारे, राजा माने यांच्यासह पुरस्कारप्राप्त मान्यवर.

चांगला विचार केला तर चांगला समाज घडत असतो. त्यामुळे आपण चांगले विचार जोपासले पाहिजेत, असे मत पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केले.

येथील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या डॉ. किर्लोस्कर सभागृहात रविवारी सहकार महर्षी, स्वातंत्र्यसेनानी, माजी आमदार कै. वि. गु. शिवदारे यांच्या जयंतीनिमित्त वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या जीवनगौरव पुरस्काराचे वितरण औसेकर महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी यशोधरा हॉस्पिटलच्या माध्यमातून २५ वर्षांपासून रुग्णसेवेत समर्पित योगदान डॉ. बसवराज कोलूर (वैद्यकीय), पाखर संकुलच्या माध्यमातून असंख्य अनाथ बालकांचे संगोपन व शिक्षण करणाऱ्या शुभांगी बुवा (सामाजिक), माढा तालुक्यातील बेंबळे गावचे विविध पिकांचे विक्रमी उत्पादन घेणारे प्रयोगशील शेतकरी सोमनाथ हुलगे (कृषी) आणि ३० वर्षांहून अधिक काळ पत्रकारितेच्या माध्यमातून समर्पित भावनेने आणि निष्ठेने काम करणारे दैनिक संचारचे प्रशांत जोशी (पत्रकारिता) या विविध क्षेत्रातील चार मान्यवरांचा जीवनगौरव पुरस्काराने गौरव करण्यात आला. प्रत्येकी २१ हजार १ रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

या प्रसंगी डिजिटल इंडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष राजाभाऊ माने यांनी 'सहकारापुढील आव्हाने आणि संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रशांत जोशी, डॉ. कोलूर, बुवा व हुलगे आदी पुरस्कारप्राप्त मान्यवरांनीही आपले मनोगत व्यक्त करून प्रतिष्ठानने केलेल्या या गौरवाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास भारती राजशेखर शिवदारे, पुण्याचे उद्योगपती बालाजी शिंदे, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे, माजी अध्यक्ष सुभाष मुनाळे, प्रकाश वाले, प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. चन्नगोंडा हविनाळे, तुकाराम काळे, प्रमोद बिराजदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शुभदा शिवपुजे उपासे यांनी केले. आभार डॉ. बाहुबली दोशी यांनी मानले.

गौरवाची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प

राजशेखर शिवदारे यांनी प्रतिष्ठानच्यावतीने मान्यवरांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, समाजातील चांगले काम करणाऱ्यांचा सन्मान प्रतिष्ठानच्या माध्यमातून नव्या पिढीला प्रेरणा देणे हाच या पुरस्कारामागचा हेतू असून शिवदारेअण्णा यांची जन्मशताब्दी येत्या वर्षभरात साजरी केली जाणार असून त्यासाठी नवनवीन संकल्पना सूचवाव्यात, असे आवाहन केले.

पेनुर येथे डुकरामुळे पिकांचे नुकसान; गुन्हा दाखल

✔ मोहोळ/प्रतिनिधी

डुकरानी शेतातील मक्याचे पिक कुरतडून खाल्ल्याने २५ हजाराचे नुकसान झाले.ही घटना पेनुर (ता. मोहोळ) येथील भोसले यांच्या शेतात शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. या प्रकरणी पोलिसांनी वराह पालन करणाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पेनुर येथे भारत हनुमान भोसले यांची शेती असून त्यात त्यांनी मका लावले आहेत. शिवाय याच गावात दगडू निवृत्ती निंबाळकर हा वराह पालन करतो. तो डुकरांना बंदिस्त ठेवत बसल्यामुळे डुकरे मोकाट होऊन गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करीत होते. या संदर्भात शेतकऱ्यांनी त्याला समज दिली होती. शनिवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारात भारत भोसले हे शेतात गेले असता निंबाळकर याचे डुकरे मक्याचे पीक कुरतडून सुमारे २५ हजाराचे नुकसान केल्याचे दिसून आले. त्यानंतर भोसले यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दगडू निवृत्ती निंबाळकर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला. हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

७० हजाराचे दागिने पळवले

येथील बस स्थानकात प्रवासासाठी निघालेल्या आसमा मुजफ्फर सय्यद (रा.कर्जत जि. अहिल्यानगर) यांच्या पिशवीतून चोरट्याने २३ ग्रॅम वजनाचे दागिने पळवले. ही चोरी शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडल्याची नोंद बार्शी शहर पोलिसात झाली. हवालदार दबडे पुढील तपास करीत आहेत.

झोपेत पलंगावरून पडल्याने जखमी

झोपेत असताना पलंगावरून खाली पडल्याने एक तरुणी जखमी झाल्याची घटना बाळीवेस एसबीआय बँकेजवळ शनिवारी मध्यरात्री घडली. आरती तानाजी करडे (वय २२, मूळ रा. आंबेजोगाई, जि. बीड, सध्या रा. बाळीवेस, सोलापूर) असे जखमी तरुणीचे नाव आहे. ती शनिवारी रात्री साडेअकरा वाजता घरात पलंगावर झोपलेली असताना झोपेत खाली पडली. यात पलंगाखाली ठेवलेला पत्रा हाताला लागल्याने जखमी झाली. तिला उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात (मामा) किशोर यांनी दाखल केले.

भांबुर्डी येथे शेतातून सौर ऊर्जेच्या ९० हजाराच्या प्लेटा गायब

वृद्ध शेतकऱ्याच्या शेतातून चोरट्यांनी दिवसा ९० हजार रुपये किमतीच्या सौर ऊर्जेच्या प्लेटा पळविले .ही चोरी भांबुर्डी (ता. माळशिरस) येथील दडस यांच्या शेतात घडली१५ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी महादेव आबा दडस (वय ८० रा.भांबुर्डी) या शेतकऱ्यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास अनोळखी चोरट्यानी त्यांच्या शेतात पंपासाठी बसवण्यात आलेल्या सौर ऊर्जेच्या ९ प्लेटा चोरून नेले.याची किंमत ९० हजार रुपये असल्याचे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. सहाय्यक फौजदार निकम पुढील तपास करीत आहेत.

भावाने घातली भावाच्या डोक्यात वीट

घरगुती वादातून एक भावाने आपल्या भावास डोक्यात विटेने मारून जखमी केल्याची घटना पूर्व भागात दत्तनगर येथे रविवारी सकाळी घडली. मधुकर दत्तात्रय निकम (वय ५४, रा. दत्तनगर, आडम मास्तर ऑफिसजवळ) असे जखमी भावाचे नाव आहे . घरगुती वादातून त्यांना त्यांच्या भावाने वीट फेकून मारली. यात ते जखमी झाले. ते उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात स्वतः दाखल झाले.

अज्ञात वस्तूने मारून घेतल्याने जखमी

अज्ञात कारणावरून एका तरुणाने अज्ञात वस्तूने स्वतःच्या शरीरावर मारून येऊन जखमी झाल्याची घटना लष्कर भागात शनिवारी रात्री घडली. परशुराम विजयसिंगे (वय ३५ रा. नळ बझार सोलापूर) असे त्या जखमी तरुणाचे नाव आहे. त्याने शनिवारी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास राहत्या घराजवळ दारूच्या नशेत स्वतःच्या शरीरावर अज्ञात वस्तूने मारून घेतले. यात पोट, गळा व हाताला जखम झाल्याने तो उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात पहाटे स्वतः दाखल झाला.

मोशी(टांझानिया) : आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलिमांजारो सर करून तिरंगा फडकवताना गिर्यारोहक ओंकार जाधव.

सोलापूरचा गिर्यारोहक ओंकार जाधवने किलिमांजारो शिखरावर फडकवला तिरंगा

'स्मार्ट' सिटीच्या शिरपेचात आणखी एक रोवला गेला मानाचा तुरा

✔ १९ हजार ३४० फूट उंचीच्या प्रवासाचा टप्पा केला पार

✔ ९० किमी अंतराच्या कठीण चढाईवर मात

✔ अवयवदान मोहिमेचा दिला जगाला संदेश

✔ मोशी(टांझानिया) : मूळचा सोलापूरकर असलेला गिर्यारोहक ओंकार रामचंद्र जाधव याने १५ ऑगस्ट २०२५ रोजी आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलिमांजारो (१९,३४० फूट) सर करून तिरंगा फडकवत स्वातंत्र्य दिन साजरा केला.

११ ऑगस्ट रोजी मोशी (टांझानिया) येथून मोहिमेला सुरुवात झाली. तब्बल ९० किमी अंतराची कठीण चढाई पार करून १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७:३० वाजता -१५ अंश तापमानात शिखर गाठण्यात आले. शिखरावर पोहोचताच ओंकार यांनी भारताचा तिरंगा फडकावला तसेच अवयवदान मोहिमेचा संदेश देत त्याचे महत्त्वही अधोरेखित केले. ओंकार यांनी यापूर्वी एव्हरेस्ट बेस कॅम्प (२०२१) सर केला असून सह्याद्रीतील अनेक किल्ले सर करण्याचा अनुभव त्यांना आहे.

३६० एक्सप्लोरर व एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांचे मार्गदर्शन त्याला लाभले हे खासच. ही मोहीम ३६० एक्सप्लोरर आंतरराष्ट्रीय साहसी पर्यटन संस्थेमार्फत आयोजित करण्यात आली होती. या संस्थेची स्थापना २०१७ मध्ये सोलापूरचे पहिले एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी केली असून आज ती जगभरातील गिर्यारोहकांना साहसासाठी मार्गदर्शन करते. आफ्रिकेतील टांझानियामध्ये असलेले माउंट किलिमांजारो (१९,३४१ फूट) हे खंडातील सर्वात उंच पर्वत असून जगभरातील गिर्यारोहकांचे स्वप्न आहे. हा पर्वत ज्वालामुखीजन्य असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून जवळपास ६ किमी आहे. किलिमांजारोवर चढाई करताना सर्वात मोठा धोका म्हणजे अत्यंत वेगाने बदलणारे हवामान व अत्यल्प ऑक्सिजनमुळे होणारा सुरुवातीला हिरवेगार जंगल, नंतर कोरडी टुंड्रा, आणि अखेरीस बर्फाच्छादित शिखर - अशा विविध पट्ट्यांतून गिर्यारोहकांना प्रवास करावा लागतो. या दरम्यान थंडी, ऑक्सिजनची कमतरता, डिहायड्रेशन, तसेच शारीरिक व मानसिक थकवा हे धोके सतत जाणवत राहतात. अनुभव नसल्यास किंवा चुकीच्या गतीने चढाई केल्यास उंचीशी जुळवून घेणे अवघड ठरते. त्यामुळेच योग्य अक्लिमटायझेशन, मार्गदर्शन व शिस्तबद्ध नियोजन केल्याशिवाय किलिमांजारोवर चढाई करणे धोकादायक ठरू शकते. ओंकारने हे शिखर सर करून सोलापूरच्या शिरात मानाचा तुरा रोवला आहे.

> "माझ्या वडिलांची इच्छा होती की मी साहसी फिल्डमध्ये काहीतरी करावे. त्यांच्यानंतर त्यांच्या इच्छेने या फिल्डमध्ये आलो आणि हे यश त्यांच्या आठवणींना समर्पित आहे.
>
> –ओंकार जाधव, गिर्यारोहक

> "ओंकारसारख्या तरुण गिर्यारोहकांना किलिमांजारोसारख्या शिखरावर घेऊन जाण्याचा व मार्गदर्शन करण्याचा अभिमान आहे. ३६० एक्सप्लोररच्या माध्यमातून अनेकांना अशा आव्हानात्मक मोहिमांचा अनुभव घेता येतो, हेच आमचे ध्येय आहे.
>
> –आनंद बनसोडे, ३६० एक्सप्लोरर व एव्हरेस्टवीर